**ठळक बातम्या**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित /भारताची राज्यघटना प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखीच मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं राज्यसभेत प्रतिपादन
- झारखंडमधे सरकार स्थापनेसाठी माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा राज्यपालांकडे दावा
- महाराष्ट्रात झिका विषाणूंचा संसर्ग झालेले रुग्ण आढळल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून सर्व राज्यांना मार्गदर्शक नियमावली जारी
- हाथरस दुर्घटनेतल्या मृतांची संख्या १२१ वर

**आणि**

- पहिल्यांदाच ८० हजारांच्या पार गेलेला मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स दिवसअखेर ५४५ अंकांची वाढ नोंदवत ७९ हजार ९८७ अंकांवर बंद

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज कालच संस्थगित करण्यात आलं होतं. त्यामुळे संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित झालं आहे.

तत्पूर्वी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर राज्यसभेत झालेल्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर दिलं. मणिपूरमधली परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी सरकार सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताची राज्यघटना ही प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखीच मार्गदर्शक असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच राजकीय वारसा नसलेल्या व्यक्तीला राजकारणात

येण्याची आणि इतक्या मोठ्या पदावर पोहचण्याची संधी मिळाली, असंही ते म्हणाले. काँग्रेस हा संविधानाचा सर्वात मोठा शत्रू असून त्यांची मानसिकता एससी, एसटी आणि ओबीसींना विरोध करण्याची आहे, अशी टीकाही नरेंद्र मोदी यांनी केली.

प्रधानमंत्र्यांचं भाषण सुरू असतानाच, विरोधकांनी गदारोळ करत सभात्याग केला. विरोधकांकडे प्रश्नांची उत्तरं ऐकण्याचं धाडस नसल्यानं त्यांनी सभात्याग करत सभागृहाचा अपमान केल्याचं मोदी म्हणाले.

**<><><><><>**

राज्यसभेत सरकार दिशाभूल करणारी माहिती सांगत असल्यानं आज विरोधकांनी सभात्याग केला, असं विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खर्गे यांनी संसदेबाहेर बातमीदारांशी बोलताना सांगितलं. काँग्रेस पक्ष राज्यघटनेचा सर्वात मोठा विरोधक असल्याच्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आरोपावर त्यांनी आक्षेप नोंदवला. भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघानंच राज्यघटनेला विरोध केला असल्याचा आरोप खर्गे यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

झारखंड मुक्ती मोर्चाचे कार्याध्यक्ष हेमंत सोरेन पुन्हा एकदा झारखंडच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळणार आहेत. झारखंड मुक्ती मोर्चा, काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल या इंडी आघाडीच्या घटक पक्षांच्या बैठकीत सोरेन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. विद्यमान मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांच्या रांची इथल्या निवासस्थानी ही बैठक झाली. चंपाई सोरेन यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. हेमंत सोरेन यांना आर्थिक घोटाळा प्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं अटक केल्यानंतर त्यांनी ३१ जानेवारी रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. त्यांनी आज राज्यपालांकडे सरकार स्थापनेचा दावा पेश केला.

<><><><><>

केंद्र सरकारनं विविध मंत्रिमंडळ समित्या स्थापन केल्या आहेत. आर्थिक व्यवहार विषयक समितीवर ११ सदस्य असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या समितीचे अध्यक्ष असतील. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, गृहमंत्री अमित शाह आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा सदस्यांमधे समावेश आहे. सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ समितीचे अध्यक्ष प्रधानमंत्रीच असतील. राजनाथ सिंग, अमित शाह, निर्मला सीतारामन आणि परराष्ट्रमंत्री एस जयशंकर इत्यादी सदस्य असतील. दहा सदस्यीय संसदीय व्यवहार समितीच्या अध्यक्षपदी राजनाथ सिंग असतील, राजकीय व्यवहारविषयक समितीमधे प्रधानमंत्र्यांसह १४ सदस्य असतील.

<><><><><>

महाराष्ट्रात काही ठिकाणी झिका विषाणूंचा संसर्ग झालेले रुग्ण आढळल्यानंतर केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयानं सर्व राज्यांना मार्गदर्शक नियमावली जारी केली आहे. २ जुलैपर्यंत पुण्यात सहा तर कोल्हापूर आणि संगमनेर इथं प्रत्येकी एक अशा एकूण आठ झिकासंक्रमित रुग्णांची नोंद झाली आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांनी झिका विषाणू संसर्गासंदर्भात अधिक दक्षता बाळगावी असे निर्देश मंत्रालयानं दिले आहेत. विशेषतः झिका संक्रमित गर्भवती मातांची तपासणी आणि गर्भाच्या वाढीवर देखरेख ठेवावी आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काम करावं असं यात म्हटलं आहे. हा आजार संक्रमित एडीस प्रजातीचा डास चावल्यानं होत असल्यानं आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांनी त्यादृष्टीनं देखरेख ठेवत आपला परिसर एडीस डासापासून मुक्त ठेवण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याला तैनात करावं, असे निर्देश देखील राज्यांना दिले आहेत.

निवासी वस्त्या, कार्यालयं, संस्था, बांधकाम सुरु असलेली ठिकाणं, शाळा, महाविद्यालयं आणि आरोग्य सुविधा केंद्रांमध्ये कीटकांची उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि रोगवाहक सूक्ष्मजीव प्रतिबंधक उपक्रम अधिक प्रमाणात राबवावेत यावरही मंत्रालयानं भर दिला आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात हाथरस जिल्ह्यातल्या फुलराई गावात सत्संगादरम्यान चेंगराचेंगरीमुळे झालेल्या दुर्घटनेत जखमी झालेल्यांची उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज भेट घेतली. त्यानंतर मंत्री आणि राज्याचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेचा तपास करण्यासाठी सरकारने विशेष तपास पथक स्थापन केल्याचं आदित्यनाथ यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. या पथकानं प्राथमिक अहवाल सादर केला असून घटनेचा सखोल तपास करण्यात येत आहे असंही मुख्यमंत्री म्हणाले. निवृत्त न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखाली या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल, निवृत्त प्रशासकीय अधिकारीदेखील या चौकशी समितीचा भाग असतील असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

या दुर्घटनेत आतापर्यंत १२१ जणांचा मृत्यू झाला असून ३१ जण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांच्या कुटुंबीयांना चार लाख तर जखमींना एक लाख रुपये देण्याची घोषणा सरकारनं केली आहे.

**<><><><><>**

हाथरस दुर्घटनेबद्दल रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना शोकसंदेश पाठवला आहे. या दुर्घटनेत जखमी झालेले नागरिक लवकर बरे होवोत अशी सदिच्छा पुतीन यांनी या संदेशात व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या इंदोर इथल्या श्री युगपुरुष धाम बौद्धिक केंद्रात अन्नाद्वारे विषबाधा झाल्याचा संशय असलेली ५ मुलं आज दगावली. उर्वरित ३८ मुलांवर उपचार सुरु आहेत. या मुलांच्या प्रकृतीची काटेकोर दक्षता घेतली जात असल्याचं इंदोरचे जिल्हाधिकारी आशिष सिंग यांनी प्रसारमाध्यमांना सांगितलं.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज व्यवहारादरम्यान ८० हजार अंकांची महत्त्वपूर्ण पातळी २ वेळा ओलांडली. पहिल्यांदाच ८० हजारांच्या पार गेलेला सेन्सेक्स दिवसअखेर ८० हजारांच्या पातळीवर बंद होऊ शकला नाही.

दिवसअखेर सेन्सेक्स ५४५ अंकांची वाढ नोंदवून ७९ हजार ९८७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीनंही आज नवा उच्चांक नोंदवला आणि २४ हजार ३०० ची पातळी ओलांडली. दिवसअखेर निफ्टी १६३ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २८७ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टी आज पहिल्यांदाच ५३ हजारांच्या पलीकडे जाऊन स्थिरावला.

<><><><><>

टी-ट्वेंटी विश्वचषक विजेता भारतीय संघ उद्या पहाटे भारतात दाखल होणार आहे. सकाळी भारतीय संघ नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेईल. त्यानंतर दुपारी या संघाचं मुंबईत आगमन होईल. मुंबईत मरीन ड्राइव्हवर त्यांची विजयी मिरवणूक काढली जाणार आहे. या मिरवणुकीनंतर वानखेडे मैदानावर विशेष सत्कार सोहळ्याचं आयोजन केल्याची माहिती BCCI चे सचिव जय शहा यांनी दिली. या सोहळ्यात या खेळाडूंना आणि व्यवस्थापनाच्या सदस्यांना BCCI नं जाहीर केलेलं सव्वाशे कोटी रुपयांचं बक्षीस प्रदान केलं जाईल.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात किनवट इथं आज नीती आयोगाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते संपूर्णता अभियानाचा

प्रारंभ करण्यात आला. आकांक्षी तालुका कार्यक्रमांतर्गत सर्व निकष ऑगस्टअखेर पूर्ण केले जातील, असं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी सांगितलं.

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा तालुक्यातही जुलै, ऑगस्ट, आणि सप्टेंबर या तीन महिन्यात संपूर्णता अभियान राबवलं जाणार आहे त्याचं उद्घाटन उद्या परंडा येथे होत आहे.

या अभियानात देशातल्या ५०० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. या अभियानामार्फत जुलै ते सप्टेंबर या कालावधीत गरोदर मातांची तपासणी, उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, गरोदर मातांना पोषण आहार, मृदा आरोग्य पत्रिका आणि स्वयंसहाय्यता गटांना खेळतं भांडवल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात अमरावती, बीड, चंद्रपूर, गडचिरोली, नांदेड, जालना, नंदुरबार, हिंगोली, नाशिक, धाराशिव, पालघर, सोलापूर, वाशिम, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा या अभियानात समावेश झाला आहे.

**<><><><><>**

रत्नागिरीत देशातलं पहिलं सागरी विद्यापीठ उभारायला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी थोड्या वेळापूर्वी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. रत्नागिरीत शासकीय विधी महाविद्यालय उभारायलाही मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिल्याचं सामंत यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**